# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

दिनांक :- २३/०९/२५

## कोटेशन नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि. ३०/०९/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा आधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोटेशन सादर करताना सोबत पॅन क्रमांक, वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर सादर करणे बंधनकारक आहे.

---

**महानगरपालिकेचे वाहन क्र. एमएच-०४-एलक्यु-४४३७ (टाटा एलपीटी १२१६) (मॉडेल सन २०२३) या टँकर वाहनाची दुरुस्ती :-**

**टायर नविन फिटींग करुन मिळणे बाबत :-** सदर वाहनास स्टँण्डर्ड कंपनीचे ८.२५ x २० या साईजचे ०६ नग टायर, टयुब फ्लॅबसह नविन फिटींग करुन दुरुस्ती करणे.

**हब ग्रिसिंगची दुरुस्ती :-** वाहनचालक यांच्या रिपोर्ट नुसार सदर वाहनाचे टायर डिस्क व हब चेक केले असता जास्त प्रमाणात गरम होते. तरी हब ग्रिसिंग करणे गरजेचे आहे. तरी चारही साईडचे टायर खोलुन ड्रम व एक्सल खोलुन सर्व जुने बेरिंग ऑईल सिल, ग्रीस, सरक्लीप बाहेर काढुन खराब झालेले पार्ट, बेरींग बाहेर काढुन त्याजागी स्टँडर्ड कंपनीचे बेरींग, ऑईल सिल, सरक्लिप, पॅकिंग फीट करुन योग्य प्रमाणात ग्रीस भरुन दुरुस्ती करणे.

**स्टार्टर व अल्टरनेटरची ची दुरुस्ती :-** १) स्टार्टर व अल्टरनेटर दोन्ही खोलुन सर्व प्रथम स्टार्टर पुर्णपणे डिसमेंटल करणे. २) डिसमेंटल केलेले स्टार्टर चे सर्व पार्ट पेट्रोल ने स्वच्छ करुन सव्हिसिंग करणे. ३) स्टार्टर चे खराब झालेले पार्ट, बुश, कार्बन होल्डर, कार्बन सोलोनाईट स्वीच नविन फिट करुन स्टार्टर ची फिटींग करणे. ४) डिसमेंटल केलेले अल्टरनेटर चे सर्व पार्ट पेट्रोल ने स्वच्छ धुवून सव्हिसिंग करणे. ५) अल्टरनेटर च्या दुरुस्ती कामी डायलोट प्लेट, कट आऊट, कार्बन ब्रश, बेरींग नविन फिटींग करुन अल्टरनेटरची दुरुस्ती करणे. ६) नविन व्ही बेल्ट १ नग फिटींग करणे. ७) खराब झालेले डायवट प्लेट नविन फिट करुन अल्टनेटर ची पुर्ण दुरुस्ती करणे.

**उप अभियंता (यांत्रिकी)**
**तथा वाहन विभाग प्रमुख**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

---

दिनांक २३/०९/२०२५

खालील ठिकाणी प्रसिद्ध केली.

१) मनपा संकेतस्थळ